रमाई आवास घरकुल योजने अंतर्गत घरकुलाकरिता द्यावयाच्या अनुदानाबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक रआयो-२०१६/प्र.क्र.५७८/बांधकामे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ७ जानेवारी, २०१७.

संदर्भ:- १) शासन ज्ञापन, सा.न्या.व वि.स.वि. क्र.रआयो-२०१४/ प्र.क्र.१०/ बांधकामे, दिनांक १८.७.२०१४.
२) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.वि. क्र. रआयो-२०१६/प्र.क्र.५७८/बांधकामे, दि.३०/९/२०१६.

प्रस्तावना :-

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना दिनांक १५ नोव्हेंबर, २००८ च्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आली असून वरील संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये सदर घरकुल योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजनेंतर्गत घराच्या अनुदानाची किंमत मर्यादा ग्रामीण क्षेत्रासाठी रु.७०,०००/- इतकी होती. सदर योजना ही ग्राम विकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या इंदिरा आवास योजनेच्या धर्तीवर राबविण्यात येत आहे. ग्राम विकास विभागाने इंदिरा आवास योजनेच्या अनुदानाच्या किंमतीत दि.७ नोव्हेंबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये दि.१ एप्रिल, २०१३ पासून रु.७०,०००/- वरुन रु.१,००,०००/- इतकी वाढ केलेली आहे. त्याच धर्तीवर या विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी राबविण्यात येत असलेल्या रमाई आवास योजनेंतर्गत ग्रामीण भागातील घरकुलाच्या अनुदानाची किंमत दि.१ एप्रिल, २०१३ पासून रु.७०,०००/- वरुन रु.१,००,०००/- इतकी करण्यास संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) च्या धर्तीवर रमाई आवास योजनेच्या निकशात बदल करण्यात आले असून सामाजिक आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ यादीच्या निकषाबाहेरील प्राधान्यक्रम यादीतून निवडण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मंधील लाभार्थ्यांना ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक १४/१०/२०१६ शासन निर्णयान्वये देण्यात येणारे अनुदान विचारात घेऊन रमाई आवासयोजनेतंर्गत लाभार्थ्यांच्या अनुदानात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासन निर्णय दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ च्या निकषानुसार निवडण्यात येणाऱ्या रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांना पुढील प्रमाणे अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात येत आहे :-

१) रमाई आवास योजनेंतर्गत (ग्रामीण), प्रति घरकुल (शौचालय बांधकामासह) अनुदान साधारण क्षेत्र रु.१,३२,०००/- व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी (शौचालय बांधकामासह) रु.१,४२,०००/- निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) शौचालय बांधण्यासाठी लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या रु.१२,०००/- ची प्रतिपूर्ती, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून करण्यात येईल.

Scanned with CamScanner

३) प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मधील लाभार्थ्यांप्रमाणे रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांना MGNREGA अभिसरणाद्वारे साधारण क्षेत्रासाठी रु.१७,२८०/- व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी रु.१८२४०/- अनुदान उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) रमाई आवास योजनेसाठी शहरी भागातील (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायत) वैयक्तिक लाभार्थ्यांकरीता प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) प्रमाणे (३० चौ.मी. घरकुल बांधकामासाठी) लाभाची रक्कम व लाभार्थ्यांची पात्रता त्यामध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात येत असून त्यानुसार वार्षीक उत्पन्न रु.३.०० लक्ष पर्यंत असलेल्या लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी रु.२.५० लक्ष अनुदान अनुज्ञेय राहिल.

५) वरील प्रमाणे ग्रामीण व शहरी भागातील सुधारित अनुदान सन २०१६-१७ या आर्थिक वर्षा पासून लागू राहील. तसेच ज्या लाभार्थ्यांना यापुर्वी घरकुल मंजूर झाले आहे परंतु पहिला हप्ता सन २०१६-१७ मध्ये दिला आहे त्यांनाही सुधारित अनुदान अनुज्ञेय राहील.

२. नरेगा बाबत वेळोवेळी आयुक्त नरेगा यांच्या सुचनांनुसार कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या योजनेकरीता लाभार्थ्यांना सुधारीत केलेल्या दरानुसार मस्टरव्दारे मजूरी देण्याची आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. पंतप्रधान आवास योजनेच्या धर्तीवर अभिसरणानुसार रमाई आवास योजनेकरिता नरेगा अंतर्गत जॉब कार्डधारक लाभार्थी यांना ई-मस्टरव्दारे मजूरी देय राहील. त्याकरिता लाभार्थ्यांनी गटविकास अधिकाऱ्याकडील मस्टर व काम सुरु करण्याच्या आदेश प्राप्त झाल्यावर काम सुरु करणे बंधनकारक राहील. ही रक्कम अनुदान स्वरुपात नसून मजूरी प्रदानाकरिता मस्टरव्दारे जेवढे काम होईल तेवढे नरेगाच्या EFMS व्दारे शाखा अभियंता, जिल्हा परिषद यांच्या मुल्यांकनानंतर मजूराच्या बँक खात्यावर गटविकास अधिकारी यांच्यामार्फत जमा होईल. सदर योजना अभिसरणाव्दारे फक्त ग्रामीण भागातील घरकुलाकरिता राहील.

४. सदर शासन निर्णयास ग्रामविकास व जलसंधारण विभाग, नियोजन विभाग (रोहयो) या विभागांची सहमती घेण्यात आलेली आहे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.८/२०१७/व्यय-१५ दि.०३/०१/२०१७ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकतेस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१७०१०७१७०३१९५६२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d81b5c910bad583767f88ac97a75b312f0e5744ecbdc45b7704dcb27f5d4dfef, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2017.01.07 17:07:02 +05'30'

(अनिल कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.



Scanned with CamScanner

२) मा.सभापती, विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
३) मा.अध्यक्ष, विधानसभा, विधान भवन, मुंबई.
४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
६) मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
७) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८) सर्व विधानसभा/विधान परिषद सदस्य
९) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव, नियोजन (रो.ह.यो) विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कक्ष, नवी मुंबई.
१७) सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा.
१८) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१९) सर्व जिल्हाधिकारी,
२०) सर्व महानगरपालिका आयुक्त,
२१) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
२२) सर्व मुख्याधिकारी नगरपालिका / नगरपरिषद.
२३) प्रादेशिक उपायुक्त, (सर्व) समाजकल्याण.
२४) सहायक आयुक्त (सर्व) समाजकल्याण विभाग.
२५) सर्व सह सचिव/उपसचिव/अवर सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय मुंबई
२६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १ / २, मुंबई/नागपूर
२७) वित्त विभाग (व्यय-१४/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई
२८) संचालक, लेखा व कोषागारे, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईट, मुंबई
२९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३०) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
३१) निवडनस्ती (बांधकामे)



Scanned with CamScanner

रमाई आवास घरकुल योजनेत
ग्रामीण क्षेत्रातील घरकुलाच्या
संदर्भात सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन शुध्दिपत्रक क्रमांक : रआयो-२०१६/प्र.क्र.५७८/बांधकामे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ०८ डिसेंबर, २०१७

वाचा :-

१) शासन निर्णय,सा. न्या. व वि. स. वि. क्र.बीसीएच २००८/प्र.क्र.३६/मावक २, दि.१८/११/२००८
२) शासन निर्णय, सा. न्या. व वि. स. वि. क्र.बीसीएच २००९/ प्र.क्र.१५९/ मावक-२, दि.९/३/२०१०.
३) शासन निर्णय, सा. न्या. व वि. स. वि. क्र.बीसीएच-२००९/ प्र.क्र.१५९/ मावक-२, दि.२/१२/२०१०.
४) शासन निर्णय, सा. न्या. व वि. स. वि. क्र. रआयो-२०१४/ प्र.क्र.१०/ बांधकामे, दि. १८/७/२०१४
५) शासन निर्णय, सा. न्या. व वि. स. वि. क्र.इंआयो-२०१४/ प्र.क्र.४१३/योजना-१०, दि.१०.२.२०१६
६) शासन ज्ञापन, सा. न्या. व वि. स. वि. क्र.रआयो-२०१६/ प्र.क्र.५७८/बांधकामे, दि. ३०.९.२०१६

**शासन शुध्दिपत्रक :-**

रमाई आवास योजनेच्या लाभार्थी निवडीबाबत उपरोक्त संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयातील परिच्छेद १ मधील (५), पुढीलप्रमाणे वाचावा-

(५) अ) "सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC -२०११) यादीतील जे अनुसूचित जाती तथा नवबौध्द लाभार्थी SECC -२०११ च्या प्राधान्य क्रम यादी (Generated Priority List ) मध्ये अंतर्भूत आहेत; त्यांची निवड प्रधानमंत्री आवास योजना (PMAY-G) साठी (PMAY-G) च्या निकषानुसार करण्यात येईल.

ब) सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC -२०११) च्या प्रपत्र "ड" मध्ये असलेले अनुसूचित जाती तथा नवबौध्द लाभार्थी जे रमाई आवास योजनेचे (ग्रामीण) अद्ययावत निकष पूर्ण करत असतील, रमाई आवास घरकुल (ग्रामीण) या योजनेत लाभार्थी म्हणून पात्र असतील.

Scanned with CamScanner

सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१७१२०८१६३९५४५६२२ असा आहे. हे शुध्दिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Social Justic and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d81b5c910bad5837d7f88ac97a75b312f0e5744ecbdc45b7704dcb27f5d4dfef, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2017.12.08 16:42:26 +05'30'

(अ.कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.सभापती, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
३) मा.अध्यक्ष, विधान सभा, विधान भवन, मुंबई
४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
६) मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
७) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य
९) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
१०) अप्पर मुख्य सचिव(वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, नियोजन (रो.ह.यो.) विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कक्ष, नवी मुंबई
१७) सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
१८) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे



Scanned with CamScanner

१९) सर्व जिल्हाधिकारी,

२०) सर्व महानगरपालिका आयुक्त,

२१) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

२२) सर्व मुख्याधिकारी नगरपालिका / नगरपरिषद

२३) प्रादेशिक उपायुक्त, (सर्व ) समाजकल्याण

२४) सहायक आयुक्त (सर्व) समाजकल्याण विभाग

२५) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई

२६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१ / २ मुंबई / नागपूर

२७) वित्त विभाग (व्यय-१४/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई

२८) संचालक, लेखा व कोषागारे, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई

२९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

३०) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे

३१) निवड नस्ती (बांधकामे).



Scanned with CamScanner

ग्रामीण क्षेत्रातील लाभार्थ्यांची वार्षिक
उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : रआयो-२०१७/ प्र.क्र.३५७/बांधकामे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०१ ऑक्टोंबर, २०१८.

वाचा :- १) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.वि.क्र.बीसीएच-२००८/प्र.क्र.३६/मावक-२, दि.१५/११/२००८
२) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.वि.क्र.बीसीएच-२००९/प्र.क्र.१५९/मावक-२, दि.९/३/२०१०
३) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.वि.क्र.रआयो-२०१६/प्र.क्र.५७८/बांधकामे, दि.३०/९/२०१६
४) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.वि.क्र. रआयो-२०१६/प्र.क्र.५७८/बांधकामे, दि.७/१/२०१७

शासन निर्णय:-

सामाजिक आर्थिक जात जनगणना (SECC) २०११ नुसार प्राथम्य यादीतील (priority list) लाभार्थ्यांना पंतप्रधान आवास ग्रामीण योजनेचा लाभ दिला जातो. प्रधानमंत्री आवास योजनेतील वगळण्याच्या निकषानुसार (Exclusion Criteria) प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण मधून वगळलेली परंतू ज्या कुटूंबाचे मासिक उत्पन्न रु.१०,०००/- पेक्षा कमी आहे, अशा अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांना रमाई घरकुल योजनेचा लाभ देणे आवश्यक आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भ क्र.३ वरील दि.३०/९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये रमाई घरकुल योजनेंतर्गत ग्रामीण क्षेत्रातील अर्जदाराकरीता रु.१.०० लाख इतकी वार्षिक उत्पन्न मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. तथापि, रमाई आवास योजनेचा लाभ घेणेसाठी लाभार्थी कुटुंबाची (ग्रामीण लाभार्थी) वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.१.०० लक्ष एवढी असल्याने सदर योजनेचा लक्षांक पूर्ण करण्यास व लाभार्थी निवडीमध्ये अडचणी येत आहेत. त्यानुषंगाने, सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील लाभार्थ्यांना घेता यावा तसेच लाभार्थी निवडीनुषंगाने सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC-२०११) च्या निकषांस अनुसरुन रमाई आवास योजनेच्या ग्रामीण लाभार्थ्यांची वार्षिक उत्पन्न मर्यादा सद्याच्या रु.१.०० लक्ष वरुन रु.१.२० लक्ष एवढी करणे आवश्यक आहे. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील लाभार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.१.०० लाख वरुन १.२० लाख इतकी करण्यास या शासन निर्णयान्वये

Scanned with CamScanner

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१८१००११८१६५१२८२२ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=9004dcdaa63507 0fd50922eaa5dec888 8d343a4715673 8e6c9cf27e4333d60e51,
cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.10.01 18:21:55 +05'30'

(अ.कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.सभापती, विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
३) मा.अध्यक्ष, विधान सभा, विधान भवन, मुंबई.
४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
६) मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
७) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८) सर्व विधानसभा/विधान परिषद सदस्य
९) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, नियोजन (रो.ह.यो.) विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कक्ष, नवी मुंबई
१७) सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
१८) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे.
१९) सर्व जिल्हाधिकारी,
२०) सर्व महानगरपालिका आयुक्त,
२१) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२२) सर्व मुख्याधिकारी नगरपालिका/नगरपरिषद
२३) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग
२४) सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण
२५) सर्व सह सचिव/उपसचिव/अवर सचिव, सा.न्या.व वि.स.विभाग, मंत्रालय, मुंबई
२६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा), महाराष्ट्र१/२, मुंबई/ नागपूर.
२७) वित्त विभाग (व्यय-१४/ अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई
२८) संचालक, लेखा व कोषागारे, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईट, मुंबई
२९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
३०) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे

Scanned with CamScanner

रमाई आवास घरकुल (ग्रामीण) योजनेच्या लाभार्थ्यांची निवड करण्याकरीता स्थापन करण्यात आलेली समिती पुनर्गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः रआयो -२०१८/प्र.क्र.१३७/बांधकामे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: १३ फेब्रुवारी, २०१९.

वाचा :-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२००८/प्र.क्र.३६/ मावक-२, दि.१५/११/२००८.
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२००९/प्र.क्र.१५९/ मावक-२, दि.९/३/२०१०.
३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२००८/प्र.क्र.६/ मावक-३६, दि.२/१२/२०१०.
४) शासन ज्ञापन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.रआयो-२०१४/प्र.क्र.१०/ बांधकामे, दि.१८/७/२०१४.
५) शासन निर्णय, ग्रामविकास विभाग क्र.ईआयो-२०१५/प्र.क्र.४१३/योजना-१०, दि.१०/२/२०१६
६) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.रआयो-२०१६/प्र.क्र.५७८/ बांधकामे, दि.३०/९/२०१६.

प्रस्तावना :-

राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील लोकांचे राहणीमान उंचावणे व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागामध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्यासाठी शासनाने अनुसूचित जाती व नवबौध्द घटकासाठी घरकुल योजना संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये सुरु केली आहे. संदर्भ क्र.२ येथील दि.९/३/२०१० च्या शासन निर्णयान्व्ये सदर योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. राज्यात राबविण्यात येणाऱ्या इंदिरा आवास योजना या केंद्र पुरस्कृत योजनेसह सामाजिक न्याय विभागाची रमाई आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी व सनियंत्रण होण्यासाठी ग्रामविकास विभागाने रमाई आवास घरकुल (ग्रामीण) साठी संदर्भ क्र.५ च्या शासन निर्णयान्वये राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माणची निर्मिती केली आहे.

केंद्र शासनाच्या दि.१३/४/२०१६ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार इंदिरा आवास योजनेच्या नावात बदल करून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (PMAY-G) लागू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये लाभार्थी निवड सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC-२०११) प्राधान्य क्रम यादी (Generated Priority List) मधून करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सदर योजनेंतर्गत सन २०१९ पर्यंत ग्रामीण भागातील व सन २०२२ पर्यंत नागरी भागातील प्रत्येकाला

Scanned with CamScanner

पक्के घर देण्याचे लक्ष्य निर्धारीत केले आहे. सदर योजनेंतर्गत लाभार्थी निवड SECC डाटामधून केली जाणार आहे. राज्यातील सर्व मागासवर्गीयांना सन २०१९ पर्यंत स्वत:चे पक्के घर उपलब्ध करून देण्याचे शासनाने जाहीर केले आहे. तद्नुषंगाने, प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार रमाई आवास घरकुल योजना संपूर्णपणे सुधारीत करण्याच्या प्रस्तावावर स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येत आहे. सद्यस्थितीत प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत च्या लाभार्थी निवडीबाबतच्या मार्गदर्शक सूचना/निकष विचारात घेऊन त्या अनुषंगाने रमाई आवास घरकुल योजनेसाठी करावयाच्या घरकुल निर्माण समितीची पुर्नरचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

ग्रामीण क्षेत्रात निवड केलेल्या अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांची अंतिमत: निवड करण्याकरीता पुढीलप्रमाणे घरकुल निर्माण समिती पुनर्गठीत करण्यात येत आहे.

| क्षेत्र | घरकुल निर्माण समिती | पद |
|---|---|---|
| ग्रामीण | पालकमंत्री (संबंधित जिल्हाचे) | अध्यक्ष |
| | विधान सभा सदस्य संबंधित जिल्हा (अनुसूचित जातीचे) (**) | सदस्य |
| | मुख्य अधिकारी अधिकारी, जिल्हा परिषद, संबंधित जिल्हा | सदस्य |
| | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सार्वजनिक बांधकाम विभाग) | सदस्य |
| | सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग | सदस्य सचिव |

(**) ज्या जिल्ह्यात अनुसूचित जातीचे विधानसभा सदस्य नसतील, त्या जिल्ह्यात मा.मंत्री (सा.न्या. व वि.स.) महोदयांनी नामनिर्देशित केलेले विधानपरिषद सदस्य यांचा समावेश घरकुल निर्माण समितीमध्ये करण्यात यावा.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०२१४१२५४३९०६२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa615070d60922aaa5dec8883d343a4735679 8e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2019.02.14 14:58:23 +05'30'

(अनिल कों. आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव



Scanned with CamScanner

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
४) मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
६) मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
७) महालेखापाल,महाराष्ट्र,१,मुंबई
८) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
९) सर्व विभागीय आयुक्त,
१०) सर्व जिल्हाधिकारी
११) सर्व महानगर पालिका आयुक्त
१२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद
१३) आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
१४) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण, सिडको भवन (दक्षिण कक्ष) सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
१५) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग
१६) सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग
१७) सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
१८) सर्व मुख्याधिकारी नगरपालिका/नगरपरिषद
१९) संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य,पुणे
२०) सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
२१) निवडनस्ती (बांधकामे).



Scanned with CamScanner